| MHAU010006162017 | दाखल तारीख | : | २७/०१/२०१७ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | ३०/०१/२०१७ |
| | निकाल तारीख | : | १६/०७/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ०९ ०५ २० |

**भाग अ**

**अतिरीक्त सत्र न्यायाधीश औरंगाबाद यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी एम. एस. अग्रवाल)**

**सत्र खटला क्रं.३२/२०१७** **निशाणी क्रं.८१**

| | | |
|---|---|---|
| **प्रथमखबर बाबत सविस्तर माहिती, गुन्हा आणि पोलीस ठाणे** | | गु.र.क्रं.२२५/२०१६, भारतीय दंड संहिता कलम ३०६, ४९८–अ अन्वये<br>पोलीस ठाणे अंजीठा, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. |
| **तक्रारदार/अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत – पोलीस ठाणे अधिकारी<br>पोलीस ठाणेः अंजीठा, छत्रपती संभाजीनगर. |
| **अभियोगपक्षा करीता** | | **सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. काठुळे** |
| **आरोपी** | | गजानन पांडुरंग सौदागर<br>वयः ४० वर्ष, धंदाः मजुरी,<br>राः सासुरवाडा, ता.सिल्लोड,<br>जि. छत्रपती संभाजीनगर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | श्री. पी. एस. भोकरे |

---

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०९/११/२०१६ |
| प्रथमखबर दिनांक | १०/११/२०१६ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०७/०१/२०१७ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०४/११/२०१९ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १९/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय आरक्षित केल्याचा दिनांक | १६/०७/२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | १६/०७/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | आरोपीची निर्दोष मुक्तता केली. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीन दिल्याची तारीख | दोषारोप निश्चित केल्याचे कलम | शिक्षा किंवा निर्दोष सुटका | शिक्षा | संपरीक्षेदरम्यान आरोपी कोठडीत असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गजानन पांडुरंग सौदागर | १०/११/२०१६ | ११/०१/२०१६ | भा.द.वि. कलम ३०६, ४९८–अ प्रमाणे | निर्दोष सुटका | निरंक | —— |

## भाग क

## [परिच्छेद ४४ (iii) चे प्रकरण ६ फौजदारी नियमावली]

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्रं.१ | भीका तुकराम उनवणे (नि.५७) | तक्रारदार व मृतकाचे वडील |
| सा.क्रं.२ | कैलास भीका उनवणे (नि.७०) | मृतकाचा भाऊ |
| सा.क्रं.३ | डॉ. सुनिल गोरख विधार (नि.७४) | वैदयकीय अधिकारी |

**ब. बचावाचे साक्षीदार.**

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| — | — | — |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असल्यास**

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांक.**
**अ. अभियोग पक्ष.**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | ५८ | फिर्याद |
| २. | ५९ | तक्रारदाराचा फौ.प्र.सं.कलम १६४ प्रमाणे जबाब |
| ३. | ७१ | मरणोत्तोर पंचनामा |
| ४. | ७५ आणि ७६ | शवविच्छेदन अहवाल |

**ब. बचाव पक्ष.**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १) | – | – |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | २० | दोषारोप |
| २. | ८० | आरोपीचा फौ.प्र.सं.कलम ३१३ प्रमाणे जबाब |

**ड. जप्त वस्तु.**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १) | – | – |

**न्यायनिर्णय**
**(निकाल तारीख १६/०७/२०२६)**

प्रस्तुत खटल्यात आरोपीवर कलम ३०६, ४९८–अ भारतीय दंड संहिता, १८६० अन्वये गुन्हयाकरीता संपरीक्षा चालविण्यात आलेली आहे.

०२. **अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे: –**

फिर्यादी भिका उनवणे यांची मुलगी संगीता हिचा विवाह आरोपी सोबत सन

२०१० साली झाला होता. आरोपी हा दारु पीत असुन नेहमी मयताच्या चारीत्र्यावर संशय घेवुन तिला मारहाण करीत होता. मयत संगीता जेव्हा माहेरी जात होती, तेव्हा तिला झालेल्या त्रासाबाबत सांगत होती. मयताच्या नातेवाईकांनी आरोपीला समजावुन सांगितले परंतु त्याच्या वागणुकीत फरक पडला नाही. दिनांक ०९.११.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता फिर्यादीचे भाउ प्रल्हाद उनवणे यांनी फरक करुन सांगितले की, संगिता ही जळालेली असुन तिला सरकारी दवाखाना औरंगाबाद येथे नेले आहे. मयताने अंगावर रॉकेल घेवुन स्वतःला जाळुन घेतले. तिने आरोपीच्या त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली आहे. सबब, तक्रारदार यांनी अंजीठा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

०३. सदर फिर्यादीवरून अंजीठा पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे गुन्हा नोंद क्र.२२५/२०१६ भारतीय दंड संहिता चे कलम ३०६, ४९८–अ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.

०४. सहायक पोलीस निरीक्षक श्री. ए. डब्ल्यु चौधर यांनी गुन्ह्याचे तपास काम केले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. आरोपीला अटक केले व शवविच्छेदन अहवाल घेतला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपास काम पूर्ण झाल्यानंतर तपास अधिकारी यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

०५. निशाणी क्रमांक २० प्रमाणे आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता, कलम ३०६ आणि ४९८–अ अन्वये गुन्ह्याकरिता दोषारोप निश्चित करण्यात आले. सदरचे दोषारोप आरोपीला मराठीतून वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व खटल्याची संपरीक्षा पुढे चालवायची आहे असे सांगितले.

०६. अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये चा जबाब नि.८० प्रमाणे नोंदवण्यात आले. आरोपीचा बचाव असा आहे की, त्यांच्याविरूध्द खोटे आरोप लावले आहेत.

०७. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. काठुळे आणि आरोपीचे विधिज्ञ श्री. पी. एस. भोकरे यांचा युक्तिवाद ऐकला.

०८. माझे समोर उपस्थित झालेले मुद्दे व त्या संबंधीचे कारणांसहीतचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | आरोपीने लग्नानंतर दोन वर्षांनी ते दिनांक ... ०९.११.२०१६ या काळात सासुरवाडा, ता.सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृतकाला मानसिक व शारिरीक त्रास देवून छळ केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| २) | आरोपीने नमूद वेळ, काळ व ठिकाणी मृतकाचा छळ करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ३) | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता:–**

०९. याप्रकरणी सर्वप्रथम हे नमुद करणे गरजेचे आहे की, आरोपीतर्फे विधिज्ञांनी रासायनिक विश्लेषण अहवाल नि.क्र. १६ व १७ मान्य केलेले आहेत. साक्षीदार क्र.१ तक्रारदार भीका तुकाराम उनवणे यांनी सांगितले की, मयतास आरोपी हा दारु पीवुन मारहाण करीता होता. साक्षदाराने आरोपीला समजावुन सांगितले होते परंतु त्याचा उपयोग झाला नाही. तक्रारदार व त्याचा भाउ दिनांक ०९.११.२०१६ रोजी मयत हिला दवाखान्यात पाहण्यासाठी औरंगाबाद येथे आले होते. तिला पाहुन साक्षीदाराने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. साक्षीदार क्र.२ कैलास उनवणे याने सांगितले की, दिनांक १०.११.२०१६ रोजी तो सरकारी दवाखान्यात गेला होता. त्याने मयताचा मृतदेह पाहीला होता. तिचे पुर्ण शरीर जळालेले होते. सबब, मरणोत्तर पंचनामा तयार केला. मयत ही त्याची बहिण होती. आरोपी हा मयतास दारु पीवुन मारहाण करीत होता. मयताने स्वतःच्या अंगावर रॉकेल टाकुन आत्महत्या केली.

१०. डॉ. सुनिल विधाते हे सरकारी दवाखान्यात वैदयकीय अधिकारी होते. दिनांक १०.११.२०१६ रोजी त्यांनी मयताची शवचिकीत्सा केली. मयताचे वय ३५ वर्ष होते. तिचा चेहरा, मान, जबडा व मांडया जळालेला होता. जळाल्याच्या जखमा या खोलवर होत्या. मयताचे केसही जळालेले होते. त्या जखमा या लाल स्वरुपाच्या होत्या. डोके, मान व चेहरा नउ टक्के, छाती नउ टक्के, पोट सात टक्के, कंबरेचा भाग व पाठ १८ टक्के, पायाच्या वरचा भाग १८ टक्के व खालचा भाग १६ टक्के जळालेला होता. मयत ही ९३ टक्के भाजलेली होती. मयताचा मृत्यु गंभीररित्या भाजल्याने झालेला आहे.

११. वारंवार संधी देवुनही तपास अधिकारी हे हजर झालेले नाही. सबब, त्यांचा जवाब नोंदविण्यात आलेला नाही. साक्षीदार भीका उनवणे यांनी मान्य केले की, मयताचा मुलगा समाधान हा मयत झाला होता. त्याला ह्दयाचा विकार होता. आरोपीने त्याच्यावर उपचार केला होता. त्यामुळे मयताला फीट येत होती. फिर्यादी हा घटनेच्यादिवशी पोलीस ठाण्यात गेला नाही. घटनेनंतर इतर लोकांसोबत तो पोलीस ठाण्यात गेला होता. पोलीसांना माहिती त्याचा जावाई व भाउ यांनी दिली होती. फिर्यादीने त्यावर अंगठा लावला. फिर्यादीतील मजकुर त्यास माहित नाही. नातेवाईकांच्या सांगण्यावरुन तो पोलीस ठाण्यात गेला होता.

१२. साक्षीदार कैलास उनवणे याने मान्य केले की, मयताचा मुलगा छातीच्या आजाराने मयत झाला होता. साक्षीदार, फिर्यादी व आरोपी एकाच ठीकाणी उस तोडीचे काम करतात. आरोपी हा कामानिमीत्त दोन ते तीन महिने घराबाहेर राहत असे. आरोपी हा साक्षीदार कैलास व त्याच्या भावाच्या लग्नात मध्यस्थी होता. मयतास वाटत होते की, आरोपीने टॅक्ट्ररवर काम करु नये व उस तोडीचे काम करुन नये. आरोपीने आगाउ रक्कम घेतल्याने उस तोडीचे काम करावे लागत होते. सबब, मयत व आरोपी यांच्या वाद होता. समाधानच्या मृत्युमुळे मयताची मानसिक स्थीती चांगली नव्हती. आरोपीने तिला अनेक दवाखान्यात नेले होते. तिला साक्षीदाराच्या घरी राहण्यासाठी आणले होते. मयत चिंचवन येथे तिच्या आईवडीलांसोबत राहीली होती. मयतास सिल्लोड दवाखान्यात घेवुन गेले व त्यानंतर औरंगाबाद येथील सरकारी दवाखान्यात आणले. आरोपी हा दवाखान्यात होता. तो अत्यंविधीला हजर होता. आरोपीने त्याच्या गावातील लोक आणले होते.

१३. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यावरुन असे दिसते की, फिर्यादी, साक्षीदार, व आरोपी हे एकाच ठीकाणी काम करीत होते. मयताचा मुलगा समाधान हा छातीच्या आजाराने मरण पावला होता. मयताला आरोपीचे काम आवडत नव्हते. म्हणुन तिचे आरोपीसोबत भांडण होत होते. मयतावर आरोपीने अनेक ठीकाणी उपचार केले. मयताची मानसिक परीस्थीती चांगली नव्हती. मयताचा मृत्यु हा जळाल्याने झालेला आहे. परंतु, मयतास आरोपीकडुन शारीरीक मानसिक छळ केल्याबाबत पुरावा आलेला नाही.

१४. भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ प्रमाणे, एखाद्या महिलेला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारी, तिच्या जीवाला, अवयवांना किंवा आरोग्याला (मानसिक किंवा शारीरिक) गंभीर दुखापत करणारी, किंवा तिच्या किंवा तिच्या नातेवाईकांना बेकायदेशीर मालमत्तेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी जबरदस्तीने छळ करणारी कोणतीही जाणूनबुजून केलेली कृती म्हणजे छळ आहे. याप्रकरणी आरोपींनी मयत यांचा छळ करणारी अशी कोणतीही कृती केल्याचे सिध्द होत नाही.

१५. नि.क्र. ५८ फिर्याद पाहता असा निष्कर्ष काढण्यात आला की, त्यातील आरोप हे केवळ सर्वसाधारण आणि अस्पष्ट स्वरूपाचे आहेत. तसेच, कथित गुन्ह्यांसाठी आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता हे आरोप पुरेशा प्रमाणात करत नाहीत. भा.दं.सं. कलम ४९८–अ हा गुन्हा सिद्ध होण्यासाठी, पतीच्या कुटुंबाकडून केला जाणारा कूरपणा हा गंभीर दुखापत करण्याच्या किंवा पीडितेला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्याच्या अथवा पीडितेला स्वतःलाच गंभीर दुखापत करून घेण्यास भाग पाडण्याच्या उद्देशाने केलेला असणे अनिवार्य आहे.

१६. भारतीय दंड संहिता कलम ३०६ प्रमाणे मृतक हिला आत्महत्या करण्यासाठी चिथावणी दिली किंवा मदत केली हे सिध्द होणे आवश्यक आहे. आत्महत्येसाठी कारणीभूत ठरणारी थेट किंवा अप्रत्यक्ष कृती भारतीय दंड संहिता कलम १०७ नुसार सिध्द होणे आवश्यक आहे. फक्त भांडण किंवा वाद झाल्यामुळे समोरच्या व्यक्तीने आत्महत्या केल्यास, जोपर्यंत आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा थेट पुरावा मिळत नाही, तोपर्यंत हा गुन्हा सिद्ध होत

नाही. सबब, अभियोग पक्षाने मृतकास छळ करून तिला आत्महत्या करणेसाठी प्रवृत्त केले हे आवश्यक व थेट पुरावा देवून सिध्द केले नाही असे अनुमान काढले.

१७. अभियोग पक्षास आरोपीविरुध्दचे गुन्हे संशयापलीकडे सिध्द करण्यात यश आले नाही. सबब, अभियोग पक्षाने दिलेला पुरावा विश्वसनीय नसल्याने तो आरोपीविरुध्द गुन्हे सिध्द करण्यास समाधानकारक व पुरेसा नाही. या सर्व कारणांकरिता अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ आणि ३०६ प्रमाणे गुन्हे सिध्द केले नाही. सबब मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतात.

<u>मुद्दा क्रमांक. ३ करीता</u> :–

१८. अभियोगपक्षाला आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द करण्यास अपयश आलेले आहे. परिणामतः आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतातः–

## <u>आदेश</u>

१) आरोपी गजानन पांडुरंग सौदागर यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) नुसार भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ आणि ३०६ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र व वैयक्तीक जात मुचलका रद्द करण्यात येतात.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ अन्वये रुपये २०,०००/–चे वैयक्तिक बंधपत्र व त्याच रक्कमेचा एक जामीन दयावा. सदर जामीन आजपासुन सहा महिन्यासाठी अस्तित्वात राहील.

Digitally signed by MANISH SURYAKANT AGRAWAL
Date: 2026.07.16 15:37:07 +0530

(एम. एस. अग्रवाल)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
औरंगाबाद

दिनांकः १६/०७/२०२६.
छत्रपती संभाजीनगर

Directly dictated and typed on dais computer on :- 16-07-2026
Checked by the Presiding Officer on :- 16-07-2026
Digital singed by the Presiding Officer on :- 16-07-2026

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file judgment are same, word to word as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sau. M. H. Shamnani |
| Court | : | Shri. M. S. Agrawal<br>Adhoc District Court-1 Aurangabad. |
| Judgment date | : | 16-07-2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 16-07-2026 |
| Judgment uploaded on | : | 16-07-2026 |